महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे,मौजे मालगांव -मिरज,ता.मिरज,जि.सांगली येथील शितगृह सुविधा एकूण ८५६ MT क्षमतेचे शितगृह As is where is पद्धतीने Lock & Key तत्वावर आऊटसोर्सिंग पध्दतीने पाच वर्षे(३+२)कालावधी साठी देण्याचे नियोजन आहे.त्याबाबतच्या अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com संकेतस्थळावर पाहता येतील .

१. अर्जाची छाननी व दरांची तुलना केल्यानंतर तांत्रिक आणि उच्चतम दर प्राप्त अर्जदाराचा अर्ज मान्य करण्यात येईल.

२. अर्जदाराने एकूण ८५६ MT क्षमतेचे शितगृहाकरीता दर नमूद करणे आवश्यक आहे. जास्तीत जास्त दर प्राप्त होणाऱ्या दराच्या निविदा/दरपत्रके विचारात घेतले जातील.

३. प्रत्यक्ष ताबा दिल्याच्या दिनांकापासून पुढील ६० महिने कालावधीकरीता मिरज येथील शितगृह लॉक ॲण्ड की तत्वावर भाड्याने देण्याचा निर्णय घेण्यात येईल.

४. यशस्वी अर्जदार/निविदाकार यांचा आरक्षण/ भाडे कालावधी(3+2) संपुष्टात आल्यानंतर, त्यांचा मूळ कालावधीतील व्यवसाय संबंधांचा आढावा घेवून ६ + ६ महिने मुदतवाढ देणेबाबत अंतिम निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा राहील.

५. आरक्षण/भाडे कालावधी ६० महिने असून त्यामधील ३६ महिने लॉक इन कालावधी असणार आहे. लॉक इन कालावधी मध्ये आरक्षण रद्द करता येणार नाही. तसेच दरवर्षी ६% प्रमाणे भाडे दरवाढ देणे बंधनकारक राहील.

६. आरक्षण रद्द करणेसाठी लॉक इन कालावधीनंतर किमान ९० दिवसांची पूर्व नोटीस देणे बंधनकारक राहील.

७. मिरज येथील शितगृहामधील चेंबर्स लॉक ॲण्ड की भाडे तत्वावर दिल्यानंतर यशस्वी निविदाकाराने तेथे ४°C ते १२°C या तापमानामध्ये साठवणूक योग्य फक्त कृषी उत्पादने प्राधान्याने साठवणूक करणे बंधनकारक राहील. (उदा. फळे, भाजीपाला, कडधान्ये, मिरची, सुकामेवा, इत्यादी)

८. मिरज येथील ८५६ MT क्षमतेचे शितगृह लॉक ॲण्ड की वर दिल्यानंतर यशस्वी अर्जदाराने प्रत्येक महिन्याचे गोदाम भाडे व GST रक्कम अग्रीम स्वरूपात (महिन्याच्या पहिल्या सप्ताहामध्ये) RTGS/NEFT द्वारे महामंडळाच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील. विलंबाने भाडे जमा केल्यास प्रत्येक ३० दिवसांपर्यंत (प्रति मासिक) २% प्रमाणे विलंब दंड आकारणी करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाराकाराने साठवणुकीतील मालाचा विमा उतरविणे व त्याची प्रत महामंडळास सादर करणे बंधनकारक राहील. इमारत व मशिनरी यांचा विमा महामंडळाकडून उतरविण्यात येईल.

१०. साठवणूकीतील मालाचा विमा न उतरवल्यास भाडे करार रद्द करण्याचा अधिकार महामंडळाकडे राखून ठेवण्यात आला आहे. तसेच साठवणूकीतील मालाचे नुकसान झाल्यास व त्याचा विमा नसल्यास त्या नुकसानी पोटी महामंडळाकडून कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

११. सदर लॉक ॲण्ड की तत्वाच्या आरक्षणापोटी/भाडे तत्वापोटी निविदाकाराने सादर केलेल्या दराप्रमाणे सहा महिन्याचे भाडे ऐवढी समतुल्य रक्कम विना व्याज सुरक्षा ठेव रकमेपोटी मिरज वखार केंद्रावर जमा करणे बंधनकारक राहील. सुरक्षा तारण ठेव रक्कम जमा केल्यानंतरच चेंबर्सचा ताबा देण्यात येईल.

१२. सुरक्षा तारण ठेव रक्कम उद्देशिय पत्राच्या दिनांकापासून ८ दिवसांत जमा न केल्यास,निविदा/दरपत्रक रद्द करण्यात येवून, बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१३. लॉक ॲण्ड की तत्तवावर दिलेल्या चेंबरचा ताबा कार्यदेशाच्या दिनांकापासून ३ दिवसात न घेतल्यास निविदा/दरपत्रक रद्द ठरवण्यात येवून बयाना रक्कम जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल.

१४.शितगृहामधील चेंबरमध्ये थंड वातावरणातील हाताळणी (उत्तराई-चढाई इत्यादी) याची जबाबदारी यशस्वी निविदाकार/दरपत्रकदार यांची राहील. तसेच हाताळणीचे पर्यवेक्षण यशस्वी निविदाकार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या निगरानी खाली करण्यात येईल त्याची जबाबदारी महामंडळाची राहणार नाही.

१५. शितगृहाच्या चेंबरमध्ये साठवणूकीसाठी आवश्यक साहित्य (डनेज, क्रेट, पॅलेट इत्यादी) यशस्वी अर्जदाराने स्वखर्चाने करणे आवश्यक राहील. सदर साहित्य अथवा त्यापोटी येणार खर्च महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१६. शितगृहाचा मशिनरी ऑपरेट करण्याची जबाबदारी निविदाकाराकडे राहील. तसेच त्यापोटी येणारे विज देयक अदा करण्याची जबाबदारी निविदाकाराकडे राहील.

१७.सदर आरक्षित जागेतील साठवणूकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे यशस्वी अर्जदाराचा तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही. तसेच त्या सबबी खाली भाडे नाकारता / थकविता येणार नाही.

१८. सदर आरक्षित जागेत नाशवंत शेतमाल साठवणूकी मुळे मिरज वखार केंद्रावर निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकार यांची राहिल. तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची यशस्वी अर्जदाराकाने काळजी घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.

१९. यशस्वी निविदाकार यांनी महामंडळाशी विहित नमुन्यात आरक्षण/भाडे कालावधीचा साठवणूक करारनामा नोंदणी करणे बंधनकारक राहील.

२०. करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक बाबींचा सर्व खर्च यशस्वी निविदाकार यांना करावा लागेल.

२१. निविदाकार यांनी सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास सदर अर्जदारचा महामंडळाकडे जमा केलेली बयाणा रक्कम रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच सदर अर्जदारकास पुढील ३ वर्षे कालावधीसाठी महामंडळाकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

२२.**यशस्वी ठेवीदाराला चारही चेंबर भाडे तत्वावर घेणे बंधनकारक राहील.**

-सही

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक